महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गैरवर्तणुकीमुळे महाविद्यालयाचे शैक्षणिक वातावरण दूषित होणार नाही याची खबरदारी घेणे बंधनकारक राहील. महाविद्यालयात बेशिस्त निर्माण करणाऱ्या विद्यार्थ्यावर पुढील प्रमाणे कारवाई होऊ शकते.

१) **विविध प्रकारच्या शस्त्रांद्वारे दहशत निर्माण करणाऱ्या विद्यार्थ्यांना ताबडतोब पोलीसांच्या हवाली करण्यात येईल तसेच त्यांचा प्रवेश सुद्धा रद्द करण्यात येईल.**

२) **विद्यार्थ्यांनी व्हरांड्यामध्ये गोंधळ करून किंवा आपसात मोठ्याने बोलून चालू असणाऱ्या शैक्षणिक कार्यात व्यत्यय आणू नये. अशी वर्तणूक करणाऱ्या विद्यार्थ्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.**

३) **महाविद्यालयाच्या कोणत्याही संपत्तीचे नुकसान करणाऱ्या विद्यार्थ्यावर वैयक्तिक आणि सामुहिक दंडात्मक कारवाई करण्यात येईल.**

४) महाविद्यालयात येताना प्रत्येक विद्यार्थ्याने अभिज्ञानपत्र (I Card) सोबत आणणे आवश्यक आहे.

## महाविद्यालयीन चाचणी परीक्षा (College Test Examination)

विद्यापीठ परीक्षेसाठी सक्षम व्हावे म्हणून सेमीस्टर प्रमाणे सराव परीक्षा घेण्यात येईल. या परीक्षेला बसणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या सर्वसामान्य नियमांचे पालन करणे आवश्यक राहील. याशिवाय प्रत्येक विषयामध्ये किमान ४० टक्के गुण मिळवणे आवश्यक राहील. यापेक्षा कमी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच चाचणी परीक्षेला अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमानुसार दंड केल्या जाईल.

## अभिज्ञानपत्र किंवा ओळखपत्र (Identity Card)

प्रवेश मिळताच विद्यार्थ्यास अभिज्ञानपत्र दिले जाईल. प्रवेश मिळाल्यापासून १० दिवसाचे आत विद्यार्थ्याने अभिज्ञानपत्र न नेल्यास त्याचा प्रवेश आपोआपच रद्द होईल. अभिज्ञानपत्रातील माहितीच फक्त प्रमाणित मानली जाईल. अभिज्ञानपत्राशिवाय विद्यार्थ्याला वर्गात प्रवेश मिळणार नाही. अभिज्ञानपत्रातील माहितीत बदल करण्याचा विद्यार्थ्याने प्रयत्न केल्यास तो गुन्हा समजला जाईल आणि त्याबद्दल त्याला महाविद्यालयातून काढून टाकण्याची

शिक्षा दिली जाईल. अभिज्ञानपत्रावर मा. प्राचार्यांची/उपप्राचार्यांची सही घेणे आवश्यक आहे.

ग्रंथालय, वाचनालय, वर्ग व महाविद्यालयीन इतर कार्यक्रम अशा विविध ठिकाणी प्रवेश मिळविण्याकरिता तसेच इतर वेळी स्वत:च्या सोयीसाठी हे अभिज्ञानपत्र विद्यार्थ्यांनी सतत जवळ बाळगावे.

**१) प्रत्येक विद्यार्थ्याने प्रवेश घेतल्यानंतर ८ दिवसांचे आत अभिज्ञान पत्रावर मा. प्राचार्यांची किंवा उपप्राचार्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. मुदतीच्या आत स्वाक्षरी न घेतल्यास त्यासाठी विलंब शुल्क आकारण्यात येईल. व त्याचे सर्व अधिकार मा. प्राचार्यांना राहतील.**

**२) ८ दिवसाच्या आत स्वाक्षरी न घेतल्यास त्याची पूर्णत: जबाबदारी विद्यार्थी व पालकांची राहील. त्याला प्रवेशानंतरच्या सवलती मिळणार नाहीत.**

**३) स्वाक्षरी घेतलेले अभिज्ञानपत्र हरविल्यास ते पुन्हा मिळविण्यास विद्यार्थ्याला अर्ज करावा लागेल. तसेच अतिरिक्त शुल्क भरावे लागेल.**

**४) अभिज्ञानपत्रावर सही घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वत: हजर रहावे अन्यथा स्वाक्षरी मिळणार नाही.**

**५) प्रत्येक विद्यार्थ्याने वर्गात येताना अभिज्ञानपत्र आणणे आवश्यक आहे.**

## ग्रंथालय (Library)

महाविद्यालयाचे ग्रंथालय समृद्ध आहे. त्यात विविध विषयांची पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथ, मासिके, पाक्षिके इत्यादींचा समावेश आहे. ग्रंथालयातील पुस्तकांची संख्या ६५,००० पेक्षा अधिक आहे. ग्रंथालय सेवेचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी आपले व्यक्तिमत्त्व विकसित केले पाहिजे. ग्रंथालय सेवेसंबंधी विद्यार्थ्यांनी पुढील नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

**१) प्रत्येक विद्यार्थ्याला दोन ग्रंथालय तिकिटे (Borrorwer Tickets) देण्यात येतील. त्यापैकी एक पाठ्यपुस्तकांसाठी आणि एक सामान्य पुस्तकासाठी राहील. त्यांचे आधारे त्यांना उपलब्ध ग्रंथ साठ्यातून दोन पुस्तके मिळू शकतील.**

**२) ग्रंथालयातील पुस्तके घरी नेण्यासाठी विद्यार्थ्याला दिलेली सभसदत्त्वाची तिकीटे हरविल्यास त्याची माहिती संबंधित विद्यार्थ्याने त्वरित लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. कारण त्यासाठी तो विद्यार्थी व्यक्तिश: जबाबदार समजला जाईल. मूळ तिकिटे (बी.टी. कार्ड) हरविल्यास प्रत्येकी २५ रुपये शुल्क आकारून दुसरी तिकीटे मिळू शकतील.**

३) प्रत्येक विद्यार्थी हा आपल्या सभासद तिकीटांसाठी आणि ओळखपत्रासाठी व्यक्तिश: जबाबदार राहील. त्या तिकीटांचा कोणी दुरूपयोग करून त्यावर पुस्तक नेले तर त्याची जबाबदारी विद्यार्थ्यावर राहील तसेच त्यामुळे ग्रंथालयाचे काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई त्याला करून द्यावी लागेल.

४) **जर पुस्तकाची काही हानी झाली असेल तर ते पुस्तक नेण्यापूर्वी ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देणे हे विद्यार्थ्याचे कर्तव्य आहे. त्यानुसार अधिकृत नोंद करवून घ्यावी. नोंद नसल्यास पुस्तक हानीची जबाबदारी विद्यार्थ्यावर राहील. त्या संदर्भात ग्रंथपाल ठरवतील त्याप्रमाणे त्याला रक्कम भरावी लागेल.**

५) **घरी वाचावयास दिलेली पुस्तके मुदतीत परत केली पाहिजेत. पुस्तके परत करण्यास विलंब झाला तर पाठ्य पुस्तकासाठी दर दिवसाला पाच रुपये आणि सामान्य पुस्तकासाठी दोन रुपये आकार (दंड) द्यावा लागेल.**

६) **विद्यार्थ्याच्या नावावर असलेले पुस्तक गहाळ झाल्यास त्याची दुसरी प्रत आणून द्यावी लागेल. जर त्याची दुसरी प्रत उपलब्ध नसल्यास ग्रंथालय समिती जितकी रक्कम ठरवतील तितकी रक्कम भरपाई म्हणून द्यावी लागेल.**

७) वाचनकक्षातील कर्मचाऱ्याला ओळखपत्र दाखविल्याशिवाय वाचनकक्षात प्रवेश दिला जाणार नाही. वाचनकक्षात शांतता भंग करणाऱ्या विद्यार्थ्यास वाचनकक्षाबाहेर घालविण्याचा अधिकार तेथे उपस्थित ग्रंथालय कर्मचाऱ्यास राहील. विद्यार्थ्याकरिता तयार केलेली ग्रंथालय तिकीटे (बी. टी. कार्ड) विद्यार्थ्याने वापराकरिता न नेल्यास, विद्यार्थ्याला ती खराब झाल्याबद्दल प्रत्येकी पाच रुपये शुल्क भरावे लागेल.

८) प्रत्येक विद्यार्थ्याने वाचन कक्ष सोडण्यापूर्वी आपल्या जवळील पुस्तके, मासिके नियतकालिके परत केली पाहिजेत. वाचनकक्षाबाहेर कोणतेही वाचन साहित्य नेता येणार नाही. त्या संबंधीचे सर्व नियमभंग दंडनीय राहतील.

९) प्रवेश द्वारावरील ग्रंथालयीन कर्मचाऱ्याला ग्रंथालयाबाहेर जाणाऱ्या कोणत्याही वस्तुची पाहणी करण्याचा अधिकार राहील.

## ● राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.) ● शारीरिक शिक्षण योजना

## ● राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) ● लोकसंख्या शिक्षण मंडळ (आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग)

● विद्यापीठ नियमानुसार पदवी वर्गाच्या विद्यार्थ्यांना खालील चार योजनांपैकी एका प्रकारात सहभागी होता येईल.

१) शारीरिक शिक्षण योजना ३) राष्ट्रीय सेवा योजना

२) राष्ट्रीय छात्र सेना ४) लोकसंख्या शिक्षण मंडळ

● राष्ट्रीय छात्र सेनेत प्रवेशासंबंधीच्या अटीची पूर्तता करणाऱ्या विद्यार्थ्याला सहभागी होण्याची संधी मिळेल.

● राष्ट्रीय सेवा योजना व लोकसंख्या शिक्षण मंडळ यांच्या प्रवेशासंबंधीच्या अटींची पूर्तता करणाऱ्या विद्यार्थ्याला त्यामध्ये सहभागी होण्याची संधी मिळेल.

या योजनांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना ८० टक्के उपस्थितीचे बंधन पाळणे आवश्यक आहे. उपस्थिती कमी असल्यास नियमानुसार विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता येणार नाही. या योजनासंबंधी विद्यापीठ आणि शासन यांनी ठरविलेले सर्व नियम बंधनकारक राहतील. राष्ट्रीय सेवा योजना आणि लोकसंख्या शिक्षण मंडळ व राष्ट्रीय छात्र सेनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमानुसार काही विशेष संधी मिळू शकतात.

### राष्ट्रीय छात्र सेनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमानुसार प्राप्त होणारे विशेष लाभ व संधी

१) सी–प्रमाणपत्र ('C' Cert.) धारकांसाठी सैन्यात कमिशन मिळण्याकरिता ३२ जागा आरक्षित आहेत.

२) (Hav, Clerk in Any) या पदाकरिता बी–प्रमाणपत्र ('B' Cert.) धारकांना चार गुणांचा भार (Weightage) मिळेल.

३) केंद्रीय राखीव दलात एन.सी.सी प्रमाणपत्र धारकांना विशेष सवलती आहेत.

४) टेलिफोन ऑपरेटर या पदाकरिता एन.सी.सी. प्रमाणपत्र धारकांना दहा गुणांची सवलत असते.

५) छात्र सैनिकांना आपले कर्तव्य करत असताना अपघात / मृत्यू झाल्यास २,००,००० रुपयापर्यंत नुकसान भरपाई मिळते.

६) बोर्डाच्या परीक्षेत ७५ टक्के पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी १,००० रुपये डी.जी.एन.सी.सी. तर्फे शिष्यवृत्ती मिळते.

७) बी आणि सी प्रमाणपत्र धारकांना महाराष्ट्र सरकारच्या पोलीस सेवांमध्ये अग्रक्रम मिळतो.

८) गणराज्य दिन परेडसाठी दिल्लीला जाणाऱ्या छात्रसैनिकाला महाराष्ट्र सरकारतर्फे १,००० रुपये मिळतात.

९) कमी उत्पन्न असणाऱ्या हुशार विद्यार्थ्याला मा. मुख्यमंत्र्यातर्फे शिष्यवृत्ती मिळते.

१०) औद्योगिक प्रशिक्षण संस्था मध्ये प्रवेशासाठी एन.सी.सी. बी प्रमाणपत्र धारकांना चार गुणांची सवलत असते.

११) एन.सी.सी. मध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठाच्या परिक्षेत दरवर्षी जास्तीत जास्त १० गुण मिळू शकतात.

१२) एन.सी.सी. छात्रांना सहारा ग्रुप तर्फे सहारा स्कॉलरशिप रु. १५,००० मिळू शकते. तसेच व्यावसायिक उच्च शिक्षणाकरिता (यू.जी.सी. मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाकरिता) रु. ५०,००० शिष्यवृत्ती मिळते.

१३) महाराष्ट्र राज्यातील कॅडेट्सना (विद्यार्थ्यांना) मुख्यमंत्री शिष्यवृत्ती रु. ९०० मिळते. तसेच बेस्ट एन.सी.सी. कॅडेट प्रत्येक ग्रुपला रु. ३००० शिष्यवृत्ती मिळते.

राष्ट्रीय सेवा योजना व लोकसंख्या शिक्षक मंडळ यात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमानुसार विद्यापीठ परिक्षेत पहिल्या वर्षी जास्तीत जास्त १० गुण मिळू शकतात. शारीरिक शिक्षण (क्रीडा विभाग) विभागात सहभागी विद्यार्थ्यांना विद्यापीठ स्तरावरील कामगिरीनुसार १० गुण मिळू शकतात. तसेच विद्यापीठ चमूत निवड झाल्यास २५ गुण मिळू शकतात.

## महाविद्यालयाचा वार्षिकांक : साहित्य साधना

महाविद्यालयातर्फे प्रकाशित होणाऱ्या साहित्य साधना या वार्षिकांकाच्या संपादकांची नेमणूक, लेख, छायाचित्रे, छपाई इत्यादी बाबत प्राचार्यांचा निर्णय अंतिम राहील. साहित्य साधनेसाठी द्यावयाचे लेख १५ डिसेंबर पर्यंतच स्वीकारले जातील. शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण विषयांवर लेख, कविता, चुटके, कथा लिहून विद्यार्थ्यांनी साहित्य साधना हा अंक अधिक समृद्ध केला पाहिजे.

## सायकल स्टॅण्ड

संपूर्ण सत्रासाठी सायकलधारक, दुचाकी वाहनांसाठी संपूर्ण सत्रासाठीचे शुल्क संस्था ठरवेल त्याप्रमाणे आकारण्यात येईल. स्टॅण्डचे सत्र शुल्क न भरणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सायकलीसाठी पाच रुपये आणि स्वयंचलित दुचाकी स्कुटर/मोटार बाईक वाहनांसाठी दहा रुपये प्रती दिन शुल्क राहील. तर बाह्य व्यक्तीच्या सायकलीसाठी पाच रुपये आणि स्वयंचलित दुचाकी स्कुटर/मोटार बाईक वाहनांसाठी दहा रुपये प्रती दिन शुल्क आकारले जाईल. इतर नियम सायकल स्टॅण्डवर पहावयास मिळतील.

## विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर नियम

१) १९९६-९७ या सत्रापासून महाराष्ट्र विद्यापीठ कायदा-१९९९ च्या अनु. ४० (२) (ब) नुसार नागपूर विद्यापीठाने केलेल्या मार्गदर्शनपर नियम क्र. ४ आणि क्र. ५ (१९९६) प्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळाची (College Students Council) स्थापना केली जाईल. या मंडळाचा कालावधी ३० एप्रिल २०२१ पर्यंत राहील. सविस्तर माहिती महाविद्यालयात सूचनेद्वारे दिली जाईल.

२) विद्यार्थ्यांजवळ अभ्यासक्रमात नमूद केलेली पाठ्यपुस्तके असली पाहिजेत. त्याचप्रमाणे आवश्यक असे इतर शैक्षणिक साहित्यसुद्धा असलेच पाहिजे.

३) प्राध्यापकांनी नेमून दिलेला, घरून आणावयाचा किंवा वर्गात करावयाचा लेखी अभ्यास विद्यार्थाने वेळेवर पूर्णपणे आणि व्यवस्थितपणे करून आणलाच पाहिजे. अभ्यास आणि नेमून दिलेले गृहपाठ या संबंधात प्रत्येक विद्यार्थ्याचे वर्तन समाधानकारक असावे. विद्यापीठ परीक्षेकरीता पात्रता ठरविताना ही बाब अवश्य विचारात घेतली जाईल.

४) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाची मालमत्ता काळजीपूर्वकपणे वापरावी. महाविद्यालयाच्या मालमत्तेची हेतुपुरस्सर केलेली हानी किंवा तिच्या केलेल्या कोणत्याही दुरुपयोगाबद्दल आणि गैरवर्तनाबद्दल शिक्षा होईल.

५) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या शिस्तीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. महाविद्यालयातील गैरवर्तणूक कडक शिक्षेस पात्र ठरेल. व अशा गैरवर्तणुकीकरीता विद्यार्थ्यास महाविद्यालयातून काढून टाकले जाईल. तसेच प्राध्यापकांनी वेळोवेळी दिलेल्या शिस्तीसंबंधीच्या सूचनांचे विद्यार्थ्यांनी पालन करावे.

६) तास सुरू होण्यापूर्वी सर्व विद्यार्थ्यांनी आपआपल्या जागी बसणे आवश्यक आहे. तास नसल्यास असणारा फावला वेळ त्यांनी वाचनालयात घालवावा. कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही कारणाकरिता, चालू असलेले वर्ग आणि महाविद्यालयाचे इतर कामकाज यात विद्यार्थ्यांच्या गैरवर्तणुकीमुळे अडथळा येता कामा नये. कोणत्याही परिस्थितीत त्यांनी व्हरांड्यात भटकू नये. उभे राहू नये.

७) विद्यार्थ्याने कोणत्याही मित्रास महाविद्यालयात भेटण्यासाठी बोलावू नये. तसेच जर कोणी अनधिकृत व्यक्ती महाविद्यालयात आलेली आढळल्यास त्याची सूचना उपप्राचार्य आणि रजिस्ट्रार यांना द्यावी.

८) विद्यार्थ्यांच्या आणि त्यांच्या पालकांच्या स्थानिक पत्त्यात बदल झाल्यास त्यांनी त्याची माहिती कार्यालयाकड ताबडतोब पाठवावी.

९) महाविद्यालयाद्वारे मिळणाऱ्या कोणत्याही शिष्यवृत्ती / सवलतींना आपण पात्र आहोत हे ठरविण्याची जबाबदारी सर्वस्वी विद्यार्थ्याची आणि पालकाची आहे. त्यामुळे त्यासाठी करावयाचे अर्ज आणि आवश्यक कागदपत्रे वेळेवर देण्याची जबाबदारी सुद्धा विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांची आहे.

१०) काही अडचणी असल्यास विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाला तसा अर्ज करावा. अर्जावर ठराविक मुदतीत निर्णय घेतले जातील. अर्जातील अडचणींचा महाविद्यालय शक्यतोवर सहानुभूतीनेच विचार करील. पण अर्ज केल्यानंतर त्यावर झालेले निर्णय जाणून घेण्याची तसेच झालेल्या निर्णयाची नोंद घेण्याची जबाबदारी सर्वस्वी विद्यार्थ्यांचीच आहे.

११) **ज्या विद्यार्थ्याला महाविद्यालयात शिकत असल्याचा दाखला (बोनाफाईड सर्टिफिकेट) पाहिजे असेल त्याला रु. १०/– शुल्क भरावे लागेल. एकदा बोनाफाईड सर्टिफिकेट दिल्यानंतर पुन्हा दिल्या जाणार नाही.**

१२) **विद्यार्थ्याला एकदा महाविद्यालय सोडल्याचे मूळ प्रमाणपत्र दिल्यानंतर कोणत्याही सबबीखाली महाविद्यालय सोडण्याचे डुप्लीकेट प्रमाणपत्र दुसरी प्रत मिळणार नाही. विद्यार्थ्यांस डुप्लीकेट प्रमाणपत्र हवे असल्यास त्याने १५०/– रु. डुप्लीकेट टी.सी. शुल्क तसेच १००/– रु. रेकॉर्ड फी असे एकूण रु. २५०/– भरावे लागेल व अर्जासोबत अफेडिव्हेट, पोलिस रिपोर्ट आणि जाहिरातीचे कात्रण जोडणे आवश्यक आहे.**

१३) पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या कार्यालयातून पदवी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी येताना पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकारचे कागदपत्र आणणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| अ) महाविद्यालयात शिकत असतानाचे अभिज्ञान पत्र | ड) रेशन कार्ड |
| ब) महाविद्यालय सोडल्याचे मूळ प्रमाणपत्र | ई) पॅन कार्ड |
| क) वाहन चालक परवाना | फ) मतदार ओळख पत्र |

अंतिम वर्षाची गुणपत्रिका आणणे अनिवार्य आहे. गुणपत्रिकेशिवाय पदवी प्रमाणपत्र मिळणार नाही.

# सार्वजनिक सुट्ट्या - २०२२-२३

विद्यापीठातील सर्व कार्यालये, शैक्षणिक विभाग, महाविद्यालये व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी सन २०२२ या वर्षाकरिता खालीलप्रमाणे सुट्या जाहीर करण्यात येत आहेत.

| क्र. | सुट्टीचे दिवस | वार | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रजासत्ताक दिन | बुधवार | २६ जानेवारी २०२२ |
| २ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | शनिवार | १९ फेब्रुवारी २०२२ |
| ३ | महाशिवरात्री | मंगळवार | १ मार्च २०२२ |
| ४ | होळी (दुसरा दिवस) | शुक्रवार | १८ मार्च २०२२ |
| ५ | गुढीपाडवा | शनिवार | २ एप्रिल २०२२ |
| ६ | रामनवमी | रविवार | १० एप्रिल २०२२ |
| ७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | गुरूवार | १४ एप्रिल २०२२ |
| ८ | महावीर जयंती | गुरूवार | १४ एप्रिल २०२२ |
| ९ | गुड फ्रायडे | शुक्रवार | १५ एप्रिल २०२२ |
| १० | महाराष्ट्र दिन | रविवार | १ मे २०२२ |
| ११ | रमझान ईद (ईद–उल–फितर) | मंगळवार | ३ मे २०२२ |
| १२ | बुद्ध पोर्णिमा | सोमवार | १६ मे २०२२ |
| १३ | बकरी ईद (ईद–उझ–झुआ) | रविवार | १० जुलै २०२२ |
| १४ | मोहरम | मंगळवार | ९ ऑगस्ट २०२२ |
| १५ | स्वातंत्र्य दिन | सोमवार | १५ ऑगस्ट २०२२ |
| १६ | पारशी नववर्ष दिन | मंगळवार | १६ ऑगस्ट २०२२ |
| १७ | गणेश चतुर्थी | बुधवार | ३१ ऑगस्ट २०२२ |
| १८ | रावबहादुर डी. लक्ष्मीनारायण दिवस | शुक्रवार | ३० सप्टेंबर २०२२ |
| १९ | महात्मा गांधी जयंती | रविवार | २ ऑक्टोबर २०२२ |
| २० | दसरा | बुधवार | ५ ऑक्टोबर २०२२ |
| २१ | ईद–ए–मिलाद | रविवार | ९ ऑक्टोबर २०२२ |
| २२ | दिवाळी (लक्ष्मीपूजन) | सोमवार | २४ ऑक्टोबर २०२२ |
| २३ | दिवाळी (बलिप्रतिपदा) | बुधवार | २६ ऑक्टोबर २०२२ |
| २४ | भाऊबीज | बुधवार | २६ ऑक्टोबर २०२२ |
| २५ | गुरू नानक जयंती | मंगळवार | ८ नोव्हेंबर २०२२ |
| २६ | ख्रिसमस | रविवार | २५ डिसेंबर २०२२ |

# शारीरिक शिक्षण (Physical Education)

(१) विद्यापीठ नियमानुसार पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण योजनेत सहभागी होणे आवश्यक आहे.

(२) महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण योजनेत सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता चाचणी (Physical Efficiency Test) विद्यापीठ नियमानुसार घेण्यात येईल.

(३) आंतरमहाविद्यालयीन आणि अन्य क्रीडा स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी संधी दिली जाईल. प्रत्येक खेळाडू हा महाविद्यालयाचा मान्यता प्राप्त पूर्णकालीन विद्यार्थी असलाच पाहिजे.

**सूचना :** शारीरिक शिक्षण विभागासंबंधीचा तपशील, शारीरिक शिक्षण योजनेतून सूट मिळण्यासंबंधीचे नियम आणि शारीरिक क्षमता चाचणी संबंधीचा तपशील पुढे दिलेला आहे.

**खालील विद्यार्थी महाविद्यालयातर्फे क्रीडा स्पर्धेत भाग घेऊ शकणार नाहीत.**

१) माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होऊन ८ वर्षे झाली असल्यास.

२) पदवी परीक्षा देणारा विद्यार्थी त्याच्या ठराविक शिक्षण सत्राशिवाय आणखी एक वर्षे अधिक पर्यंत स्पर्धेत भाग घेऊ शकतो.

३) शिक्षण सत्रातील १ जुलैला २५ वर्षाचे किंवा त्यापेक्षा अधिक वय असणाऱ्या विद्यार्थ्यांना भाग घेता येणार नाही.

४) नोकरी करणारे विद्यार्थी आंतर-महाविद्यालयीन सामने खेळू शकणार नाहीत.

५) महाविद्यालयाचे आवेदनपत्र भरताना खेळाडूने चुकीची माहिती दिल्यास त्याच्यावर होणारा दंड त्यालाच भरावा लागेल. त्याच क्षणी त्याला महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल आणि त्याची सर्व जबाबदारी विद्यार्थ्यांवर राहील.

६) जर दोन खेळाडूंची पात्रता सारखी असेल तर चमू नायकाची निवड त्यांच्या खेळाच्या शैलीनुसार केली जाईल.

**महाविद्यालयीन विद्यार्थ्यांतून अष्टपैलू खेळाडूची निवड (Best All Round Sportsman)**

शैक्षणिक सत्राच्या शेवटी समितीच्या शिफारशी आणि निर्णयानुसार महाविद्यालयाच्या अष्टपैलू खेळाडूंची निवड केली जाईल. त्याची तपशीलवार माहिती क्रीडा विभागात मिळेल, यासाठी सामान्यपणे पुढील बाबी विचारात घेतल्या जातील.

१) क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंचे नैपुण्य.

२) त्याची मैदानाबाहेरील वागणूक आणि सवयी.

३) महाविद्यालयाने नेमलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

४) ज्येष्ठतेनुसार शैक्षणिक पात्रता.

वरील अटी पूर्ण करू शकणाऱ्या विद्यार्थ्यांनी संबंधित आवेदनपत्र भरून ते ३१ डिसेंबर २०२२ आत क्रीडा विभागात सादर करावे. सर्व आवेदनपत्रांची तपासणी करून योग्य खेळाडू निवडला जाईल.

१) खेळाडूंना वापरण्याकरिता दिलेले क्रीडा साहित्य १ फेब्रुवारी २०२३ च्या आत चांगल्या स्थितीत परत करणे आवश्यक आहे. साहित्याची मोडतोड झाल्यास त्याच्या किंमतीच्या दुप्पट रक्कम आणि दंड वसूल करण्याचा अधिकार महाविद्यालयाच्या क्रीडा विभाग प्रमुखाला आहे.

२) महाविद्यालयाच्या प्रांगणात क्रीडांगणावर कोणत्याही तऱ्हेची गैरवर्तणूक किंवा बेशिस्त वर्तन दंडनीय आहे. खेळ खेळताना इजा झाल्यास महाविद्यालयातर्फे प्रथमोपचराची मदत मिळेल. अन्य कोणतीही मदत दिली जाणार नाही. **सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनींनी वैद्यकीय परीक्षेसाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे.**

३) सराव करताना, प्रवासात आणि खेळताना कोणताही अपघात झाल्यास त्याची जबाबदारी स्वत: विद्यार्थ्यांवर आणि त्याच्या पालकावर राहील. त्याबद्दलची कोणतीही नुकसान भरपाई महाविद्यालय देणार नाही.

**वैद्यकीय तपासणीसंबंधी नियम (Rules Regarding Medical Examination)**

१) प्रत्येक विद्यार्थ्याने आणि विद्यार्थीनीने महाविद्यालयाने तयार केलेल्या वेळापत्रकानुसार आणि महाविद्यालयाने नेमलेल्या अधिकाऱ्याकडून ठरविलेल्या तारखेला वैद्यकीय तपासणी करून घेणे आवश्यक आहे.

२) महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यानंतर प्रत्येक महाविद्यालयीन विद्यार्थी आणि विद्यार्थीनीने प्रपत्र–अ (फॉर्म–ए) वैद्यकीय अधिकाऱ्यांना भरून द्यावे. हे प्रपत्र त्यांना महाविद्यालयाद्वार दिले जाईल.

३) जर वैद्यकीय तपासणीकरिता दिलेल्या ठराविक तारखेला आणि वेळात महाविद्यालयीन विद्यार्थी किंवा विद्यार्थीनी उपस्थित रहात नसेल तर त्या विद्यार्थ्याला आणि विद्यार्थीनीला विद्यापीठ नियमानुसार दंड केल्या जाईल.

४) जे महाविद्यालयीन विद्यार्थी आणि विद्यार्थीनी वारंवार सूचना देऊन सुद्धा वैद्यकीय तपासणीकरीता अनुपस्थित राहतील त्यांना विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे दंड केला जाईल.

५) जे विद्यार्थी वारंवार सूचना देऊन देखील वैद्यकीय तपासणीकरीता अनुपस्थित राहतील अशा विद्यार्थ्यांची नावे मा. प्राचार्यामार्फत वैद्यकीय अधिकारी, विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाला कळवतील आणि त्या विद्यार्थ्यांवर पुढीलप्रमाणे कार्यवाही केली जाऊ शकतेल. अ) दंड (ब) महाविद्यालयातून काढून टाकणे (क) पुढील विद्यापीठ परीक्षेला बसण्याची परवानगी रद्द करणे.

**शारीरिक शिक्षण योजनेतील सहभाग आणि त्यामधून सूट मिळण्यासंबंधीचे नियम**

पदवी वर्गाचे जे विद्यार्थी एन.सी.सी./एन.एस.एस., लोकसंख्या शिक्षण मंडळ यात दाखल होणार नाहीत त्यांना शारीरिक शिक्षण आवश्यक आहे.यासंबंधीचे विद्यापीठाचे आणि महाविद्यालयाचे नियम बंधनकारक राहतील.

शारीरिक शिक्षणाच्या तासाला व एन.सी.सी. परेडला ८० टक्के उपस्थिती आवश्यक आहे. अनुपस्थितीबद्दल विद्यार्थीच पूर्णपणे जबाबदार धरला जाईल. वैद्यकीय दाखला देऊन शारीरिक शिक्षण वर्गातील उपस्थितीबद्दल हमी देता येणार नाही. जे विद्यार्थी वारंवार ताकीद देऊनही अनुपस्थित राहतील अशा विद्यार्थ्यावर नियमानुसार कारवाई केली जाईल.

**शारीरिक शिक्षणाच्या योजनेतून पुढील प्रकारच्या विद्यार्थ्यांना सूट मिळेल.**

१) महाविद्यालयात प्रवेश घेताना २६ वर्षे पूर्ण झालेले विद्यार्थी.

२) महाविद्यालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याने आणि प्राचार्यांनी वैद्यकीय कारणास्तव शारीरिक दृष्ट्या अपात्र म्हणून शिफारस केलेले विद्यार्थी.

३) (अ) आंतरमहाविद्यालयीन (ब) आंतर–विद्यापीठ (क) राज्य पातळीवरील क्रीडा स्पर्धेत भाग घेतलेले विद्यार्थी.

४) राष्ट्रीय छात्रसेनेत तीन वर्षे प्रशिक्षण पूर्ण केलेले विद्यार्थी.

५) एन.एस.एस. मध्ये भाग घेतलेले आणि दोन वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केलेले तसेच एक शिबिर केलेले विद्यार्थी.

६) महाविद्यालयाच्या क्रिडांगणावर नियमीतपणे व्यायाम करीत असणारे विद्यार्थी.

७) चालू शैक्षणिक सत्रात गिर्यारोहणाच्या मानन्यताप्राप्त अभ्यासक्रमात भाग घेतलेले विद्यार्थी.

८) महाविद्यालयाच्या पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी.

९) महाविद्यालयापासून पाच मैलांपेक्षा जास्त अंतरावर राहणारे आणि पुराव्या दाखल सरपंच किंवा राजपत्रित अधिकारी यांचा दाखला क्रीडा विभागाला सादर करणारे विद्यार्थी.

१०) विवाहित असणाऱ्या विद्यार्थिनी.

**विशेष सूचना (Special Instructions)**

ज्या विद्यार्थ्यांना वर नमूद केलेल्या कारणास्तव शारीरिक शिक्षणाच्या तासाला सूट मिळू शकते त्यांना दि. १० सप्टेंबर पर्यंत आपला अर्ज एका विशिष्ट प्रपत्रात भरून द्यावा लागेल. परंतु याबाबत सवलत देण्याचा मा. प्राचार्यांचा निर्णय अंतीम राहील. अर्ज दाखल करण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची राहील. दंड झाल्यावर त्यातून सूट मागणारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

**शारीरिक क्षमता चाचणी संबंधीचे नियम (Physical Efficiency Test)**

विद्यापीठाच्या नियमानुार (ऑर्डिनन्स-३) महाविद्यालयात बी.ए./बी.कॉम. वर्गासाठी प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याची **''शारीरिक क्षमता चाचणी'' (Physical Efficiency Test)** घेण्यात येते. या चाचणीसाठी प्रत्येक विद्यार्थ्याने उपस्थित राहिलेच पाहिजे. नागपूर विद्यापीठाच्या नियमानुसार दरवर्षी जानेवरी महिन्यात शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येईल. त्यासाठी अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्याला दंड केला जाईल. विद्यार्थ्याने शारीरिक क्षमता चाचणी दिल्यानंतर त्यांना निकाल कळविण्यात येईल.

शारीरिक क्षमता चाचणीत उत्तीर्ण होण्यासाठी खाली नमूद केलेल्या प्रत्येक क्रीडा प्रकारात एकूण ५० प्रतिशत गुण मिळणे आवश्यक आहे. तसेच त्यांना त्यातील प्रत्येक क्रीड प्रकार पूर्ण करणे आवश्यक आहे. ५० टक्के गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना ब श्रेणी मिळेल आणि ७० टक्के गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना अ श्रेणी मिळेल. कोणत्याही क्रीडा प्रकारामध्ये प्राविण्य मिळविण्याकरिता ९० टक्के गुण मिळविणे आवश्यक आहे.

✣ ✣ ✣

# सी. पी. ॲण्ड बेरार महाविद्यालय, नागपूर

**डॉ. मिलिंद बारहाते** : प्राचार्य M.Com., LL.B., M.B.A., Ph.D.

**डॉ. जितेंद्र महाजन** : उपप्राचार्य M.A.(Eco.), M.Phil., SET, Ph.D.

## प्राध्यापक वर्ग

### ✲ कला शाखा ✲

### (१) मराठी विभाग

**डॉ. सौ. रेखा वडिखाये** विभाग प्रमुख M.A., D.Ed., B.Ed., LL.B., NET, Ph.D.

**डॉ. अजय कुळकर्णी** विभाग प्रमुख (वाणिज्य भाषा) M.A., M.Phil., SET, B.Ed., Ph.D.

### (२) इंग्रजी विभाग

**डॉ. दशरथ जाधव,** विभाग प्रमुख M.A. (Eng), LL.B., B.Ed.

**डॉ. अंजली पाटील** M.A.(Eng), D.Ed., B.Ed., LL.B., SET, Ph.D.

**डॉ. अरविंद सोवनी** M.A. (Eng), SET, Ph.D.

**डॉ. रश्मी पारसकर** M.A. (Eng), B.Ed., SET, Ph.D.

### (३) संस्कृत विभाग

**डॉ. सौ. विभा क्षीरसागर,** विभाग प्रमुख M.A. (Sanskrit), B.Ed., NET, Ph.D.

### (४) अर्थशास्त्र विभाग

**डॉ. जितेन्द्र महाजन,** विभाग प्रमुख M.A. (Eco), M.Phil., SET., Ph.D.

**डॉ. विनोद डोंगरवार,** M.A. (Eco), M.Phil., NET., Ph.D., PGDRD.

### (५) राज्यशास्त्र विभाग

**प्रा. संजय अ. पुसदकर,** विभाग प्रमुख M.A., M.Phil., SET.

### (६) समाजशास्त्र विभाग

**डॉ. अरविंद जोशी,** विभाग प्रमुख M.A., M.Phil., LL.B., Ph.D.

### (७) इतिहास विभाग

**डॉ. सौ. सुनिता पांडे,** विभाग प्रमुख M.A. (Hist), M.A. (Pol. Sci.), B.Ed., NET.

### (८) गृहअर्थशास्त्र विभाग

**प्रा. प्रेरणा रत्नपारखी,** विभाग प्रमुख M.A. (Home Economics), SET.

(९) मानसशास्त्र विभाग

**डॉ. सौ. जया गोलतकर,** विभाग प्रमुख M.A., M.Phil. (Psy), LL.B., Ph.D.

## ✻ वाणिज्य शाखा ✻

(१) **डॉ. प्रफुल्ल सुदामे,** M.Com., B.Ed., M.Phil., LL.B.,Ph.D.
(२) **डॉ. अशोक मंदे,** M.Com., M.A.(Eco & Soc) B.Ed., M.Phil., Ph.D.
(३) **डॉ. चंद्रहास दीक्षित,** M.Com., M.Phil., SET, Ph.D.
(४) **डॉ. सौ. मेधा कानेटकर,** M.Com., M.Phil., SET, M.A. (Eco, Mar), Ph.D.
(५) **डॉ. सौ. रीता सोनटक्के,** M.Com., M.Phil., PGDCA, MBA, MIRPM, Ph.D.
(६) **डॉ. सौ. अंजली राऊत,** M.Com., M.Phil., Ph.D.

## ✻ शारीरिक शिक्षण विभाग ✻

**डॉ. निशांत तिपटे,** (प्रमुख, क्रीडा विभाग) B.Com., B.P.Ed., M.P.Ed., NET., Ph.D.

## ✻ ग्रंथालय विभाग ✻

# ✻ शिक्षकेतर कर्मचारी ✻

कार्यालय विभाग

| | | |
|---|---|---|
| **श्री. आधार राहाटे** | – | अधिक्षक |
| **श्री. अजय आचार्य** | – | कनिष्ठ लिपीक |
| **श्री. ऋषिकेश दुबे** | – | ग्रंथालय लिपीक |
| **श्री. संजय फुलझेले** | – | कनिष्ठ लिपीक |
| **श्री. नितीन कोंबाडे** | – | ग्रंथालय परिचर |
| **श्री. शेखर राठोड** | – | ग्रंथालय परिचर |
| **सौ. अश्विनी रारोकर** | – | ग्रंथालय परिचर |
| **श्री. द्रोणाचार्य कामळे** | – | सेवक |
| **श्री. हेमंत येलमे** | – | सेवक |
| **श्री. ए. एस. शिंगणे** | – | सेवक |

# महाविद्यालयातर्फे दिली जाणारी गुणवत्ता पारितोषिके
## (Merit Prizes Awarded by College)

१) कला आणि वाणिज्य विभागातील प्रत्येक वर्ग आणि विषयात गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्याला उत्तेजन देणे हा गुणवत्ता पारितोषिकाचा मुख्य उद्देश आहे. जरी विद्यार्थ्याला इतर कोणतीही शैक्षणिक सवलत किंवा शिष्यवृत्ती मिळालेली असली तरी पुढील अटी पूर्ण झाल्यास गुणवत्ता पारितोषिकाकरीता तो पात्र समजला जाईल.

**विशेष सूचना**

एकापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना समान गुण मिळाल्यास वरील सर्व पारितोषिके त्यांच्यात विभागून दिली जातील. या संदर्भात माननीय प्राचार्यांचा अधिकार अंतिम राहील.

**गुणवत्ता पारितोषिकांची रक्कम**

(अ) प्रत्येक वर्गासाठी पारितोषिकांची रक्कम रु. १५१ राहील.

(ब) जर कोणताही विद्यार्थी गुणवत्ता पारितोषिकासाठी नियमाप्रमाणे पात्र ठरला नाही तर त्या पारितोषिकाचे वितरण होणार नाही.

अन्य पारितोषिके

१) सर्वोत्तम एन. सी. सी. कॅडेट

२) सर्वोत्तम खेळाडू

३) राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक

४) सांस्कृतिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी

वरील सर्व पारितोषिके देताना विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती, अभ्यासातील प्रगती आणि वागणूक या सर्व बाबी विचारात घेतल्या जातील.

महाविद्यालयातर्फे विविध व्यक्तींच्या स्मरणार्थ खालील पारितोषिके दिली जातात. संबंधित पारितोषिकांसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या एकापेक्षा अधिक असल्यास पारितोषिकांची रक्कम त्यांच्यात विभागून दिली जाते.

✣ ✣ ✣

# देणगीदारांच्या वतीने देण्यात येणारी गुणवत्ता पारितोषिके

## कला शाखा (Arts Faculty)

**पारितोषिकांचे नियम व अटी :**

- पारितोषिकासाठी सी. पी. ॲण्ड बेरार महाविद्यालयाचा विद्यार्थी असणे आवश्यक आहे.
- प्रथम प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे व त्या परीक्षेत सर्वाधिक गुण असणे आवश्यक आहे.
- विषयांकरिता असलेल्या पारितोषिकासाठी प्रथम प्रयत्नात त्या विषयात सर्वाधिक गुण असणे आवश्यक आहे.
- पारितोषिकांमध्य बदल व इतर बदल करण्याचा संपूर्ण अधिकार हा मा. प्राचार्यांना राहील.
- कुठल्याही नापास झालेल्या किंवा ए.टी.के.टी. असलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक मिळणार नाही.
- विद्यार्थी/विद्यार्थिनीची वागणूक समाधानकारक व उत्तम असली पाहिजे.
- शैक्षणिक सत्रातील विद्यार्थ्यांची उपस्थिती ६०% किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

| | पारितोषिकांचे नाव | पात्रता |
|---|---|---|
| १) | स्व. मधुराबाई बळवंतराव कुलकर्णी स्मृती पारितोषिक | बारावी (कला) परीक्षा तर्कशास्त्र विषयाकरीता |
| २) | स्व. भास्कर गुणवंतराव पाठक, अचलपूर, स्मृती पारितोषिक | बारावी (कला) परीक्षा राज्यशास्त्र विषयाकरीता |
| ३) | स्व. सौ. शांताबाई दाणी स्मृती पारितोषिक | बी.ए. भाग-१ परीक्षा आवश्यक इंग्रजी या विषयाकरिता |
| ४) | स्व. प्राचार्य डॉ. ना. म. उपाख्य नानासाहेब जोगळेकर स्मृती पारितोषिक | बी.ए. भाग-१ परीक्षा अर्थशास्त्र विषयाकरिता |
| ५) | स्व. लक्ष्मणराव दाणी स्मृती पारितोषिक | बी.ए. भाग-२ परीक्षा आवश्यक इंग्रजी विषयाकरिता |
| ६) | स्व. प्रा. शंकरराव शास्त्री स्मृती पारितोषिक | बी.ए. भाग-२ परीक्षा इतिहास विषयाकरिता |
| ७) | स्व. प्रा. सौ. मंगला मधुकर वाबगावकर स्मृती पारितोषिक | बी.ए. भाग-२ परीक्षा मराठी साहित्य विषयाकरिता |
| ८) | स्व. प्रा. प्रल्हाद बळवंत कुलकर्णी स्मृती पारितोषिक | बी.ए. भाग-२ परीक्षा तत्त्वज्ञान विषयाकरिता |
| ९) | स्व. सौ. सरलाबाई सखाराम जोग स्मृती पारितोषिक | बी. ए. भाग-३ परीक्षा मराठी वाङ्मय या विषयाकरिता |
| १०) | स्व. प्राचार्य रा. ब. उपाख्य भाऊसाहेब मुरकुटे स्मृती पारितोषिक | बी.ए. भाग-३ परीक्षा तत्त्वज्ञान या विषयाकरिता |
| ११) | श्री प्रल्हाद नरहर डाऊ पारितोषिक | बी.ए. भाग-३ परीक्षा इतिहास विषयाकरिता |

| | |
|---|---|
| १२) सौ. प्रभावती प्रल्हाद डाऊ पारितोषिक | बी.ए. भाग-३ परीक्षा संस्कृत साहित्य विषयाकरिता |
| १३) सौ. सुमती जगन्नाथराव नाईकवाडे पारितोषिक | बी.ए. भाग-३ परीक्षा |
| १४) स्व. प्रा. अच्युत नागेश उपदेव स्मृती पारितोषिक | बी.ए. भाग-३ परीक्षा अर्थशास्त्र विषयाकरिता |
| १५) स्व. अधिवक्ता शंकरराव पाध्ये स्मृती पारितोषिक | बी.ए. भाग-३ परीक्षा गृहविज्ञान विषयाकरिता |
| १६) स्व. राजेंद्रलाल डे स्मृती पारितोषिक | बी.ए. भाग-३ परीक्षा इंग्रजी विषयाकरीता |
| १७) स्व. अधिवक्ता मधुकरराव कृष्णराव फडणवीस स्मृती पारितोषिक | बी.ए. भाग-३ परीक्षा इंग्रजी साहित्य या विषयाकरिता |
| १८) स्व. सौ. सुनंदा नारायणराव आचार्य स्मृती पारितोषिक | बी.ए. भाग-३ परीक्षा आवश्यक संस्कृत या विषयाकरिता |
| १९) स्व. अधिवक्ता त्र्यंबक कुलकर्णी स्मृती पारितोषिक | एम. ए. अर्थशास्त्र परीक्षा |
| २०) स्व. प्रा. गजानन सुधाकर उपाख्य राजु देव स्मृती पारितोषिक | एम. ए. भाग-२ अर्थशास्त्र परीक्षा |
| २१) स्व. प्रा. अच्युत नागेश उपदेव स्मृती पारितोषिक | एम.ए. भाग-१ व २ (अर्थशास्त्र) परीक्षा मिळून |
| २२) स्व. श्री. बिंदुमाधव पुराणिक स्मृती पारितोषिक | एम. ए. भाग-२ (राज्यशास्त्र) विषय परीक्षा |
| २३) डॉ. जे. जी. नाईकवाडे पारितोषिक | एम. ए. मराठी साहित्य |
| २४) स्व. प्रभावी गदाधर खरे स्मृती पारितोषिक | एम. ए. मराठी |
| २५) महाराष्ट्र राज्य औद्योगिक परिषद १९८० स्मृती पारितोषिक | एम. ए. सर्व विषयातून |
| २६) स्व. वसंतराव कागभट स्मृती पारितोषिक | एम. ए. भाग-१, अर्थशास्त्र सर्वाधिक गुण |
| २७) स्व. वसंतराव उर्फ नानासाहेब कागभट स्मृती पारितोषिक | एम. ए. भाग-२, अर्थशास्त्र सर्वाधिक गुण |
| २८) आशिष कुळकर्णी स्मृती पारितोषिक | एम. ए. भाग-१ अर्थशास्त्र (सांख्यिकी) |

## वाणिज्य शाखा (Commerce Faculty)

| पारितोषिकांचे नाव | पात्रता |
|---|---|
| १) स्व. प्रमोद यशवंत पाटणकर स्मृती पारितोषिक | बारावी (वाणिज्य) परीक्षा |
| २) विदर्भ अर्थ-वाणिज्य शिक्षक परिषद (२०००-२००१) स्मृती पारितोषिक | बारावी (वाणिज्य) परीक्षा अर्थशास्त्र विषयाकरिता |

| | |
|---|---|
| ३) स्व. दामाजी मारोती बाजीराव स्मृती पारितोषिक | बी. कॉम. भाग-१ परीक्षा |
| ४) स्व. रामचंद्र नागोराव बाराहाते स्मृती पारितोषिक | बी. कॉम. भाग-१ परीक्षा अर्थशास्त्र विषयाकरिता |
| ५) स्व. धुंडीराज पाध्ये स्मृती पारितोषिक | बी. कॉम. भाग-१ परीक्षा अर्थशास्त्र विषयाकरिता |
| ६) स्व. मनोहरराव हळदे स्मृती पारितोषिक | बी. कॉम. भाग-१ परीक्षा संस्कृत विषयाकरीता |
| ७) स्व. पांडुरंग दत्तात्रेय सोवनी स्मृती पारितोषिक | बी. कॉम. भाग-२ परीक्षा सांख्यिकी या विषयाकरिता |
| ८) श्रीमती सुलोचनाबाई सोवनी पारितोषिक | बी. कॉम. भाग-२ परीक्षा |
| ९) स्व. भास्करराव मुंजे स्मृती पारितोषिक | बी. कॉम. भाग-२ परीक्षा संस्कृत विषयाकरिता |
| १०) स्व. कृष्णाबाई भट स्मृती पारितोषिक | बी. कॉम. भाग-३ परीक्षा सर्व प्रथम येणाऱ्या विद्यार्थीनीस |
| ११) स्व. प्राचार्य डॉ. उमाकांत शुक्ल पारितोषिक | बी. ए., बी. कॉम. पैकी सर्वाधिक गुण |
| १२) प्राचार्य डॉ. सुधीर नारायण बोधनकर पारितोषिक | बी. कॉम. भाग-३ परीक्षा अंकेक्षण विषय |
| १३) प्राचार्य डॉ. सतीश शंकरराव शास्त्री पारितोषिक | बी. कॉम. भाग-३ अर्थशास्त्र विषयाकरिता |
| १४) स्व. गिरीजाबाई राजारामजी कोडापे स्मृती पारितोषिक | बी. कॉम. भाग-३ परीक्षा औद्योगिक कायदे विषयाकरिता |
| १५) स्व. त्र्यंबक भास्करराव खरे स्मृती पारितोषिक | बी. कॉम. भाग-३ |
| १६) स्व. प्रकाश केशवराव केतकर स्मृती पारितोषिक | एम. कॉम. भाग-१ (व्यवसायिक) व्यवस्थापन या विषयाकरिता |
| १७) अखिल भारतीय उर्जा समस्या परिषद १९८२ स्मृती पारितोषिक | एम. कॉम. साठी |
| १८) कै. श्री. वासुदेवराव के देशपांडे स्मृती पारितोषिक | एम. कॉम. अंतीम वर्ष व्यवसाय पर्यावरण |
| १९) श्री. मोतीलाल छाल्लानी पारितोषिक | उत्कृष्ट खेळाडूसाठी |

✣ ✣ ✣

# College Annual Academic Calendar 2022-23

| Day | Event | Organizing Department |
|---|---|---|
| 1st June 2022 | Admission Process Starts | Admission Committee |
| 21st June 2022 | International Yoga Day | Physical Education Dept. |
| **27th June 2022** | **Starts Session 2022-23** | |
| 2nd Week July | Workshop for Rakhi Preparing | Department of Home Economics |
| 3rd Week July | World Population day | Life Time Studies and Extension Center |
| 1st August | Lokmanya Tilak Punyathithi | History Department |
| 1st Week August | Induction Programme for Studies | Programme Committee |
| 1st Week August | Rakhi Arpan Ceremony | Department of Home Economics |
| 1st Week August | World Breast feeding Day Prog. | Home Economics Department |
| 9th August | Dr. S. R. Rangnathan Jayanti | Library |
| 2nd Week August | Sanskrit Din | Sanskrit Department |
| 14th August | Preparation of Independence Day | N.C.C., N.S.S. & Sports Dept. |
| 15th August | Independence Day | N.C.C., N.S.S. & Sports Dept. |
| 3rd Week August | Blood Donation Camp | N.S.S. |
| 29th August | National Sport Day | Game & Sports Department |
| 1st Week September | Books Exhibition by Library | Library |
| 1st Week September | N.S.S. & Population Education Club for the year | N.S.S. |
| 5th September | Teacher's Day | Programme Committee |
| 2nd Week September | Parent Teacher Meet | Programme Committee |
| 3rd Week September | National Nutrition Month Celebration | Home Economics Dept. |
| Last Week September | Unit Test - 1 | Department Wise |

| | | |
|---|---|---|
| $2^{nd}$ October | 1. Mahatma Gandhi Jayanti<br>2. Lal Bahadur Shastri Jayanti | Political Science Dept. |
| $2^{nd}$ Week October | Skill Development Programme | Department of Commerce |
| $2^{nd}$ Week October | Certificate Prog. On Banking, Finance & Insurance (CPBFI) | Department of Commerce |
| $3^{rd}$ Week October | Unit Test - 2 | Department Wise |
| $1^{st}$ Week November | Kavi Katta-Student Poetry Writing Workshop | Department of Marathi |
| $1^{st}$ Week November | Publication of “Inspire” Magazine | Department of Commerce |
| $3^{rd}$ Week November | Yog Pranayam Course | Game & Sports Dept. |
| $26^{th}$ November | Constitution Din Celebration | N.S.S. Unit |
| $3^{rd}$ December | Divyang Din | Programme Committee |
| $6^{th}$ December | Dr. Babasaheb Ambedkar Mahaparinirvan Din | Programme Committee |
| $2^{nd}$ Week December | Vocabulary Development Workshop | Department of English |
| $3^{rd}$ Week December | Career Counseling & Aptitude Test | Department of Psychology |
| $3^{rd}$ Week December | Educational Tour | Department of Political Science |
| $1^{st}$ Week January | Health Checkup Camp for Girls | Women’s Cell |
| $12^{th}$ January | World Heritage Day | History Department |
| $1^{st}$ to $15^{th}$ January | Marathi Bhasha Savardhan | Department of Marathi |
| $2^{nd}$ Week January | Medical Test | Department of Physical Education & Sports |
| $3^{rd}$ Week January | Mentor-Mentee Interaction | Department Wise |
| $25^{th}$ January | Preparation of Republic Day | N.C.C., N.S.S., Sports Dept. |
| $26^{th}$ January | Republic Day Celebration | N.C.C., N.S.S., Sports Dept. |
| $4^{th}$ Week January | Physical Test | Department of Physical Education & Sports |
| $1^{st}$ Week February | PG Students Seminar | Department of Economics |
| $19^{th}$ February | Chatrapati Shivaji Maharaj Jayanti | History Department |

| | | |
|---|---|---|
| 3rd Week February | Youthosav 2023 | Students Council |
| 3rd Week February | Alumni Association Activity | Alumni Association |
| 4th Week February | Marathi Bhasha Gaourav Din | Marathi Department |
| Last Week February | Unit Test - 3 | Department Wise |
| 1st Week March | Students Survey Under Outreach Activities | Department of Economics |
| 8th March | International Women's Day | Women's Cell |
| 3rd Week March | Placement Cell Activity | Placement Cell |
| Last Week March | Unit Test - 4 | Department Wise |
| 2nd Week April | National Seminar | Department of Commerce / Psychology |
| 3rd Week April | Faculty Development Programme | IQAC |
| 30th April | Gram Geetha Jayanti | Programme Committee |
| Last Week April | College Magazine releasing Ceremony | College Magazine Committee |
| Last Week April | Sanshodhan Peer-reviewed Journal Publishing | Place for Higher Learning and Research |
| Last Week April | CPBC Bulletin | IQAC |
| Last Week April | Feed Back From Students | Feed Back Form Committee |
| Last Week April | College Exam | All Departments |

✣ ✣ ✣

## महाविद्यालयातील कृतिशील उपक्रम

● आरोग्य संपदा ● साहित्य साधना ● समुपदेशन केंद्र ● रोजगार मार्गदर्शन केंद्र ● PBC Film Society ● माजी विद्यार्थी संघटना ● पालक संघटना ● नेट सेट परीक्षा मार्गदर्शन केंद्र ● विषय तज्ञांचे भाषण ● अभ्यास मंडळ ● विविध स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन केंद्र ● संगणक कक्ष ● अभिप्रेरणात्मक शिष्यवृत्ती व पारितोषिक ● ब्रॉड बैंड इंटरनेट सेवा ● विद्यार्थीनींच्या मार्गदर्शनासाठी महिला प्राध्यापक प्रबंधन समिती ● आधुनिक दृक श्राव्य सुविधांनी सुसज्ज परिचर्चा कक्ष ● संगणक प्रशिक्षण ● प्रवास आणि पर्यटन (ट्रॅव्हल्स ॲण्ड टुरिझम) ● सुसज्जित जिम (विद्यार्थ्यांकरिता मोफत) ● Ph.D. Guidence Centre (आचार्य पदवी मार्गदर्शन केन्द्र)

✣ ✣ ✣

## FEE STRUCTURE 2022 - 2023

### विद्यापीठ नियमानुसार शुल्क आकारण्यात येईल.

✣ ✣ ✣

टीप : विद्यापीठाच्या परीक्षा वेळापत्रकानुसार प्रवेश पत्राचे वाटप करण्यात येईल. नियम/सूचनांमध्ये बदल करण्याचा अधिकार महाविद्यालयाकडे राखीव आहे.

ज्ञानज्योत निरंतर तेवविते ही विद्यावास्तू । ज्ञानवंत यशवंत होण्या वदते तथास्तु



।। वृक्ष रक्षति रक्षितः स्वच्छ भारत समृद्ध भारत पाणी हीच खरी संपत्ती ।।

किंमत
२५ रुपये

प्रकाशक : डॉ. मिलिंद बारहाते, प्राचार्य, सी. पी. अँण्ड बेरार महाविद्यालय, तुळशीबाग, नागपूर–४४० ०३२
बीपीएस मार्केटींग इंक, तेलंगखेडी, रामनगर, नागपूर